मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा! : ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » रविवार, दि. 24 मार्च 2024 | पान- 1


# मावळमध्ये महायुतीत तिढा वाढला

## भाजपच्या बाळा भेगडेंनंतर आता : शहराध्यक्ष शंकर जगताप उमेदवारी देण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा खासदार असलेल्या मावळ लोकसभा मतदारसंघावर भाजपने प्रबळ दावा केला आहे. भाजपचे मावळचे माजी आमदार आणि माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांच्यानंतर आता पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांना उमेदवारी देण्याची मागणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. त्यामुळे महायुतीत मावळच्या उमेदवारीचा तिढा वाढतच असल्याचे दिसते.

मावळ लोकसभा मतदारसंघ महायुतीमध्ये कोणत्या पक्षाकडे राहणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. पुणे आणि रायगड या दोन जिल्ह्यांत विभागलेल्या मावळ मतदारसंघाचे प्रतिनिधित्व सलग दुसऱ्या वेळी शिवसेनेचे श्रीरंग बारणे करत आहेत. राजकीय समीकरणे बदलल्याने महायुतीमधील भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसने मावळवर दावा केला आहे. राष्ट्रवादीचे आमदार सुनील शेळके आणि खासदार श्रीरंग बारणे यांच्यात आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. शेळके यांचा खासदार बारणे यांच्या उमेदवारीला विरोध आहे. भाजपनेही मावळवर दावा केला. तिन्ही वेळेस युतीमध्ये भाजपला निवडणूक लढविण्याची संधी मिळाली नाही. या वेळी भाजपला संधी मिळावी. उमेदवार कमळाच्या चिन्हावर असावा, अशी भाजपची मागणी आहे. मावळचे माजी आमदार, माजी राज्यमंत्री बाळा भेगडे यांनी दंड थोपटले असून, त्यांचे समर्थक आक्रमक झाले आहेत.

भेगडे यांच्या समर्थकांनी आक्रमक भूमिका घेत खासदार बारणे यांच्या उमेदवारीला विरोध केला असतानाच आता पिंपरी-चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांचेही नाव पुढे आले



आहे. महायुतीत मावळची जागा भाजपलाच मिळावी. शहराध्यक्ष जगताप यांना उमेदवारी द्यावी. शहराध्यक्ष म्हणून जगताप करत असलेले कार्य याचा विचार करून त्यांना उमेदवारी दिल्यास त्यांचा विजय निश्चित होईल. शिवाय महायुती तसेच भाजपला विशेष फायदा होईल, अशा मागणीचे निवेदन भाजप शहर चिटणीस सचिन काळभोर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिले आहे.

सन २०१४ च्या निवडणुकीत शंकर यांचे बंधू दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी शेकापकडून निवडणूक लढविली होती. याचाही फायदा पक्षाला तसेच महायुतीला होऊ शकतो. त्यामुळे शंकर जगताप यांना उमेदवारी देण्याची मागणी काळभोर यांनी केली आहे. त्यामुळे आता उमेदवारीच्या स्पर्धेमध्ये भाजपच्या आणखी एका नेत्याचे नाव पुढे आले आहे. महायुतीमधील तिढा वाढतच चालला असल्याचे दिसते. यातून नेमका कसा मार्ग काढला जातो, हे पाहणे औत्स्युक्याचे ठरणार आहे.

### शिवसेनेचा प्रचार करण्यास राष्ट्रवादीचा नकार

बारामतीमध्ये शिवसेनेचे माजी आमदार विजय शिवतारे हे महायुतीचा धर्म पाळत नसल्याने शहर राष्ट्रवादी काँग्रेसने मावळमध्ये शिवसेनेच्या उमेदवाराचा प्रचार करण्यास नकार दिला आहे. शिवतारे यांनी महायुतीचा धर्म पाळला नाही, तर आम्हीही पाळणार नाही. पार्थ पवार यांचा मागील वेळी झालेल्या पराभवाचा या घडामोडीशी काहीही संबंध नाही. आता तिन्ही पक्षांची महायुती आहे. तिन्ही पक्षांनी महायुतीचा धर्म पाळावा. शिवतारे हे मुख्यमंत्र्यांचा शब्द पाळतील असा विश्वास राष्ट्रवादीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी व्यक्त केला.

# 'अल्प इंजिनिअरिंग'च्या कर्मचाऱ्यांना पगारवाढ

## चाकण औद्योगीक क्षेत्रातील सर्वाधिक वेतनवाढ : तब्बल 12 हजार 800 रुपयांची पगारवाढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना आणि अल्प इंजिनिअरिंग प्रा. लि. कंपनीमध्ये चाकण औद्योगिक पट्ट्यातील सर्वाधिक वेतनवाढ करार करण्यात आला. अल्प इंजिनिअरिंगच्या कर्मचाऱ्यांना तब्बल १२ हजार ८०० रुपयांची पगारवाढ देण्यात आली. त्यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



चाकण औद्योगिक वसाहातीमधील निघोजे चाकण येथील अल्फ इंजिनीअरिंग प्रा. लि. व स्वाभिमानी श्रमिक कामगार संघटना यांच्यामध्ये तिसरा वेतनवाढ करार झाला. यावेळी संघटनेचे प्रमुख सल्लागार आमदार महेश लांडगे, प्रमुख सल्लागार रोहिदास गाडे पाटील, संघटनेचे अध्यक्ष जीवन येळवंडे, कंपनीचे डायरेक्टर पियर डिसूजा, प्लॅन्ट हेड विनोद टिपरे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पूर्णत्वास आला आहे.

करारावरती संघटनेच्या वतीने सरचिटणीस कृष्णा रोहोकले, उद्योजक राजु बोत्रे, चिटणीस रघुनाथ मोरे, खजिनदार अमृत चौधरी, दत्तात्रय गवारी, प्रशांत पाडेकर, रविंद्र भालेराव, सोमनाथ जानराव, गृपो कंपनीचे युनिट अध्यक्ष संजय पाटील, युनिट अध्यक्ष किशोर गोरखा, उपाध्यक्ष योगेश गाढवे, सरचिटणीस महेंद्र लाड, चिटणीस सुदाम गुळवे, खजिनदार राजेश सिंग, संघटक गणेश पवार, योगेश व्यवहारे,, एच. आर. मॅनेजर गंगाधर लहाने यांनी स्वाक्षरी केल्या आहेत. कामगारानी डीजेच्या तालावर नाचून, पेढे वाटून फटाक्यांची आतिषबाजी करून आनंद व्यक्त केला.

### करारामध्ये झालेले ठळक मुद्दे...

एकूण पगारवाढ :- १२, ८०१/- ( बारा हजार आठशे एक रुपये), कराराचा कालावधी ०१/१२/२०२२ ते ३०/११/२०२५ या तीन वर्षांचा राहील. मेडिक्लेम पॉलीसी:- कुटुंबासाठी ३०००००/- रुपयांची पॉलिसी राहणार असून संपूर्ण खर्च कंपनी करणार या पॉलिसी मध्ये स्वतः, पत्नी, मुले यांचा समावेश करण्यात येणार आहे. मृत्यू साहाय्य योजना, ग्रुप एक्सीडेंट पॉलिसी, सुट्टया, दिवाळी बोनस, वैयक्तिक कर्ज सुविधा, गुणवंत कामगार पुरस्कार:- प्रत्येक वर्षी एक गुणवंत कामगारांची निवड करून त्यांना प्रत्येकी १००००/- ( दहा हजार) रुपये एवढी रक्कम प्रशस्तीपत्र व ट्रॉफी बक्षिस म्हणून देण्यात येणार आहे. कॅन्टीन आणि बस सुविधा अशा कामगार हितांच्या मुद्यांचा करारामध्ये समावेश आहे.

# आढळरावांचा शिवसेनेला 'जय महाराष्ट्र'

## शिवाजीराव आढळराव पाटील अखेर 'धनुष्यबाण' खाली ठेवून 'घड्याळ' हाती बांधणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे नेते आणि तीन वेळ खासदार शिवाजीराव आढळराव पाटील अखेर 'धनुष्यबाण' खाली ठेवून 'घड्याळ' हाती बांधणार आहेत. शिवसेनेला रामराम ठोकून आढळराव हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. केवळ समायोजन किंवा तडजोड म्हणून महायुतीतील घटकपक्षांमध्ये हे पक्षांतर होत असल्याची माहिती आहे. आढळरावांनी अजित पवार यांच्या देवगिरी बंगल्यावर जाऊन त्यांची भेट घेतली. त्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना मंगळवार २६ मार्च रोजी राष्ट्रवादीत प्रवेशाचा मुहूर्त निघाल्याची माहिती त्यांनी दिली. त्यामुळे शिरुर लोकसभा मतदारसंघात अजित पवार यांच्या राष्ट्रवादीचे शिवाजीराव आढळराव पाटील विरुद्ध शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे विद्यमान खासदार डॉ. अमोल कोल्हे अशी लढत निश्चित मानली जात आहे.

### शिवाजीराव आढळराव पाटील काय म्हणाले?

सुनील तटकरे यांनी सांगितल्याप्रमाणे, २६ तारखेला (मार्च) संध्याकाळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणावर पक्ष प्रवेश करण्यास मला ग्रीन सिग्नल दिला आहे, असं आढळराव म्हणाले. पक्षांतरानंतर तिकीट मिळणार का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला असता, "ज्या अर्थी पक्षप्रवेश करतोय, त्या अर्थी उमेदवारी निश्चित होईल का, असे बाळबोध प्रश्न विचारायची गरज नाही" असं उत्तर त्यांनी दिलं. "२०१९ चा बदला घेणार का?" या प्रश्नावरही "त्यासाठीच उभा राहणार आहे" अशी प्रतिक्रिया आढळरावांनी दिली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी माझं बोलणं झालं आहे, तसेच मुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी बोलणं झालेलं आहे. या दोघांनी पण देवेंद्र फडणवीसांशी चर्चा केली आहे. त्यामुळे माझ्या पक्षप्रवेशाला क्लीन चिट दिली आहे, अशी माहिती आढळरावांनी दिली.

मला काय, माझ्या जनतेला विजयाची १०० टक्के खात्री आहे. माझं जे कॅलक्युलेशन आहे, आजपर्यंत मी ज्या निवडणुका जिंकलो आहे, काही नसताना पहिली निवडणूक ३० हजार मतांनी जिंकलो होतो दुसरी लोकसभा निवडणूक १ लाख ८० हजारांच्या मताधिक्याने, तर तिसरी निवडणूक ३ लाख ३ हजारांनी जिंकलो होतो. चौथी निवडणूक सगळ्या निवडणुकांचे रेकॉर्ड तोडेल अशी अपेक्षा आढळरावांनी व्यक्त केली.



महायुतीतील सर्व घटकपक्षांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी बसवायचं आहे. अबकी ४०० पार ही संकल्पना केंद्र पातळीवर राबवण्यासाठी आणि राज्यात मिशन ४५, मिशन ४८ पार करण्यासाठी आम्ही सगळे मतभेद विसरुन एक दिलाने कामं करणार आणि महायुतीचे सगळे उमेदवार निवडून आणणार. ही महायुती आहे.. तिन्ही पक्षांनी ठरवलंय, त्यामुळे कोणी कोणाला पळवलं असं नाही, तर हा महायुतीचा उमेदवार आहे, असं म्हणत आढळराव रवाना झाले.

# निर्यात बंदीच्या घोळामुळे कांदा उत्पादक चिंतेत!

## कांदा उत्पादक शेतकरी, व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान: कांद्याचे भाव घसरले

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची प्रक्रीया सुरु झाली तरी कांदा निर्यातबंदीचा घोळ काही केल्या संपत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे राज्यात कांद्याचे भाव वाढून मतांचे नुकसान होऊ नये अशी परिस्थिती केंद्राने जाणून-बुजून ठेवली आहे का, निर्यातीला कोण विरोध करतेय असाही सवाल शेतकरी, व्यापारी वर्गातून उपस्थित करण्यात येत आहे. निर्यात बंदीचा घोळ मिटत नसल्याने राज्यात कांद्याचे भाव वाढण्याऐवजी पुन्हा ते घसरू लागले आहेत. कांद्याला अवघा आठ ते चौदा रुपये प्रति किलो भाव मिळत आहे. गेल्या एक महिन्यात कांद्याचे भाव सात रुपयांनी घसरले आहेत.



केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने २२ मार्च रजी एक अधिसूचना काढून ३१ मार्च २०२४ नंतरही कांदा निर्यात बंदी पुढील सूचनेपर्यंत कायम राहणार असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे येत्या आठवड्यामध्ये निर्यात बंदी उठेल व रब्बी हंगामातील कांद्याला तसेच उन्हाळी कांद्याला चांगला भाव मिळेल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. परंतु ती आता पूर्णपणे मावळली आहे. परकीय व्यापार विभागाचे महासंचालक यांचे अतिरिक्त सचिव संतोष कुमार सारंगी यांनी कांदा निर्यात बंदी कायम राहणार असल्याची अधिसूचना प्रसिद्ध केलेली आहे. त्यात म्हटल्याप्रमाणे ७ डिसेंबर २०२३ रोजी केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी लागू केली होती. ती ३१ मार्च २०२४ पर्यंत राहणार होती. मात्र नव्या निर्यात धोरणानुसार पुढील सूचना येईपर्यंत कांदा निर्यात बंदी ३१ मार्चनंतरही वाढविण्यात आली आहे.

कांदा निर्यातीसंदर्भात केंद्र सरकारच्या धरसोड वृत्तीमुळे कांदा उत्पादक शेतकरी, व्यापाऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. केंद्र सरकारने कांद्यावर ४० टक्के निर्यात शुल्क लागू केले होते. त्यानंतर राज्यासह देशात कांद्याचे भाव मोठ्या प्रमाणात घसरले होते. त्याचा फटका शेतकऱ्यांना, व्यापाऱ्यांना बसला. निर्यात शुल्क ४० टक्के आकारल्यामुळे राज्यात तसेच देशात शेतकरी संघटनांनी, विरोधी पक्षांनी विविध ठिकाणी आंदोलने केली. दिवसेंदिवस कांद्याचे भाव वाढण्याऐवजी घसरत असल्यामुळे कांद्याचा एकरी उत्पादन खर्चही वसूल होत नाही. चाकण येथील महात्मा फुले बाजारात कांद्याची आज (ता. २३) सुमारे साडेबारा हजार क्विंटल आवक झाली. कांद्याला घाऊक बाजारात प्रति किलोला केवळ आठ ते १४ रुपये भाव मिळाला. राज्यातील चाकण व नाशिक या महत्त्वाच्या बाजारांमध्ये अशी परिस्थिती आहे.

### निर्यात धोरण स्पष्ट करण्याची गरज

कांद्याचे भाव कमीत कमी प्रतिकिलोला वीस रुपये असले पाहिजे, तरच शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वसूल होतो, परंतु कांद्याचे भाव अगदी आठ ते चौदा रुपयापर्यंत आले तर शेतकऱ्यांनी करायचे काय अशी परिस्थिती आहे. केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी उठवली पाहिजे. कांदा निर्यातीचे धोरण स्पष्ट केले पाहिजे तरच शेतकऱ्यांना फायदा होईल. अन्यथा शेतकरी उध्वस्त होईल, असे कांद्याचे निर्यातदार प्रशांत गोरे - पाटील, खेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती कैलास लिंभोरे, सचिव बाळासाहेब धंद्रे यांनी सांगितले.

### निर्यातदार कंपन्यांनी खरेदी थांबवली

काही कंपन्या, व्यापारी चाकण येथील बाजारातून मोठ्या प्रमाणात कांदा खरेदी करतात. त्यामुळे कांद्याचे भाव वाढतात. परंतु निर्यात धोरण स्पष्ट नसल्याने दिल्ली, उत्तर प्रदेश, मुंबई येथील व्यापारी, निर्यातदार कंपन्यांनी खरेदी थांबवली आहे. आवक जास्त व मागणी कमी असल्याने कांद्याचे भाव दिवसेंदिवस घसरत आहेत. केंद्र सरकारने निर्यात धोरण स्पष्ट करावे, अशी मागणी खेड बाजारात समितीचे संचालक, व्यापारी माणिक गोरे, महेंद्र गोरे, विक्रम शिंदे यांनी केली आहे.

# संत तुकाराम बिज; वाहतुकीत बदल


## वाहतूक शाखेचे पोलीस उप-आयुक्त विशाल गायकवाड यांची माहिती : भाविक, वारकरी गर्दीची शक्यता




**पिंपरी | प्रतिनिधी**

देहूगाव येथे बुधवारी (दि.27) संत श्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज बिज उत्सव साजरा होत आहे. बिजनिमित्त संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज मंदीर येथे मोठ्या प्रमाणावर वारकरी सांप्रदायातील सदस्य सामान्य भाविक, वारकरी, महिला भगिनी मुले दर्शनासाठी येतात. दर्शनासाठी येणाऱ्या भाविक हे मोठ्या संख्येने आप-आपली वाहने घेवून कुटूंबासह देहूगाव येथे येत असतात. त्यामुळे देहूगाव च्या परिसरात वाहतूक कोंडी होत असते.त्यामुळे बुधवारी देहुगाव व परिसरात वाहतुकीत सोमवार (दि.25) ते बुधवार (दि.27)बदल करण्यात आला आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलीस उप-आयुक्त विशाल गायकवाड यांनी दिली आहे.

### तळवडे, महाळुंगे, चाकण वाहतूक विभाग अंतर्गत बदल



1 ) देहूगाव कमान (जुना मुंबई-पुणे हायवे) येथुन देहुगाव कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनासाठी प्रवेश बंद करण्यात येत आहे. (सार्वजनिक वाहतूक बसेस व दिंडीतील वाहने वगळून) 2) महिंद्रा सर्कलकडून फिजित्सू कॉर्नर अथवा कॅनबे चौक /आयटी पार्क चौकाकडे येण्यास सर्व प्रकारच्या वाहनांस प्रवेश बंदी करण्यात येत आहे. पर्यायी मार्ग महिंद्रा सर्कल ते निघोजे ते मोईफाटा मार्गे डायमंड चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. 3) तळेगाव-चाकण रोडवरील देहुफाटा येथुन देहूगाव जाणारे रस्त्यावरुन सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.पर्यायी मार्ग सदर मार्गावरील वाहने एच.पी. चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. 4) नाशिक पुणे हायवेवरील चाकण तळेगाव चौक तसेच स्पायसर चौक येथून महिंद्रा सर्कल मार्गे आयटी पार्क / कॅनबे चौक जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. पर्यायी मार्ग 1. सदर मार्गावरील वाहने हि मोशी भारतमाता चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. पर्यायी मार्ग 2. सदर मार्गावरील वाहने महिंद्रा सर्कल- INDURANCE चौक एच पी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. 5) देहू कमान ते 14 टाळकरी कमान ते भैरवनाथ चौक हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद, खंडेलवाल चौक 6) ते देहू कमान (मुख्य) ते परंडवाल चौक हा रस्ता सर्व प्रकारचे वाहनांसाठी बंद. 7) जुना पालखी मार्ग (कंद पाटील2 लोक चौक) ते झेंडे मळा (जकात नाका) जाणारी वाहतूक वन-वे (एकदिशा मार्ग) करण्यांत येत आहे. हा बदल सोमवारी दुपारी 12 पासून ते बुधवारी रात्री 9 वाजेपर्यंत राहणार आहे. यावेळी अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून सर्व प्रकारचे वाहनांचे वाहतुकीसाठी बंद राहील.

# “आम्ही सारे, संजोग वाघेरे” म्हणूनच प्रचार!

## कर्जतमध्ये शिवसैनिकांचा संकल्प : ठाकरेंचा संदेश घरोघरी पोहोचविण्याची घेतली जबाबदारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कर्जत येथील सर्व प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्त्यांची आढावा बैठक पक्षाचे मावळ लोकसभा संघटक आणि उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीत मतदारसंघातील महत्वाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. तसेच उद्धव ठाकरे साहेबांचा संदेश घरोघरी पोहोचविण्याची जबाबदारी आमची असून “आम्ही सारे, संजोग वाघेरे” म्हणूनच मतदारांपर्यंत पोहोचू, असा संकल्प उपस्थित शिवसैनिकांनी केला.




खोपोलीतील शहर शिवसेना जनसंपर्क कार्यालयात झालेल्या या बैठकीला शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या महिला संघटिका सुवर्णा जोशी, उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत, खालापूर तालुकाप्रमुख पिगळे, उत्तम कोळंबे, तालुका संघटक बाबू घारे, तालुका सांघटिका करुणा बडेकर, संपर्कप्रमुख सुमनताई लोगले, उपतालुका संघटिका संगीतताई खाडे, विधानसभा युवा अधिकारी संपत हडप, तालुका अधिकारी प्रथमेश मोरे, माजी सभापती पंढरी राऊत, कर्जतचे माजी सभापती प्रदीप ठाकरे, उपतालुका प्रमुख प्रमोद सुर्वे, बाजीराव दळवी, नितीन घुळे, सुरेश गोमारे, शहरप्रमुख निलेश घरत, खालापुरचे ज्येष्ठ नेते उत्तम भोईर, ज्येष्ठ शिवैनिक मदन ओसवाल, अनिल पिंगळे यांच्यासह शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षातील तसेच, महाविकास आघाडीतील विविध पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या बैठकीत मतदारसंघातील महत्वाच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. “आम्ही सारे, संजोग वाघेरे” म्हणूनच मतदारांपर्यंत पोहोचू, असा संकल्प उपस्थित शिवसैनिकांनी केला. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाची मशाल सर्वापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी घेतली आहे. तसंच उध्दव ठाकरे साहेबांनी दिलेला संदेश घरोघरी कसा पोहोचेल, यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे आश्वासन यावेळी उपस्थित सर्वांनीच दिले.

> **पिंपरी चिंचवडच्या राजकारणात मागील अनेक वर्षे योगदान देत असताना लोकांच्या अपेक्षांवर खरे उतरण्याचे काम केले. राज्याच्या राजकारणात शिवसेना पक्ष आणि उध्दव ठाकरे साहेबांना संकटात आणण्याचे काम केले गेले. सर्व बाजूंनी त्यांना घेरण्याचे काम सुरू आहे. पण नेटाने या सगळ्या संकटाचा सामना ते करत आहेत. त्यांना साथ देणे ही आपली सर्वाची जबाबदारी आहे. त्यांच्यासोबत येऊन लढण्याची भूमिका घेतली. त्यांनी माझ्यावर मावळ लोकसभा संघटकपदाची जबाबदारी सोपवली. तेव्हापासून सर्व मतदारसंघात सर्व शिवसैनिकांपर्यंत पोहोचविण्याचे काम आपण करत आहोत. आपल्या सर्वांना मिळून ही लढाई जिंकायची आहे, असे संजोग वाघेरे पाटील यांनी संवाद साधताना सांगितले. यासह मतदार संघातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी आणि तुमच्यासाठी लढण्यासाठी आपण सदैव तत्पर राहू.**
>
> **- संजोग वाघेरे, संघटक, शिवसेना मावळ लोकसभा मतदार संघ**

# बिबट्याची दहशत कायम!



**वेल्हे| प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यालगतच्या पानशेत धरणखोऱ्यातील खाणू (ता. वेल्हे) येथे 3 बिबट्यांनी एकाच वेळी जनावरांच्या कळपावर हल्ला केला. या हल्ल्यात एक गाय, एक वासरू जागीच ठार झाले, तर दुसरे वासरू गंभीर जखमी झाले. हा प्रकार गुरुवारी (दि. 21) सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास रानात घडला. सखाराम जिजाबा भोड हे रानातून जनावरे घेऊन घरी चालले होते. त्या वेळी पाऊलवाटेवरील झुडपात धबा धरून बसलेल्या 3 बिबट्यांनी एकाच वेळी जनावरांच्या कळपावर हल्ला केला. बिबट्यांना पाहून सखाराम जनावरांना सोडून धावत घरी आले. खाणू गावात दोन-तीन कुटुंबेच राहत आहेत. बिबट्यांच्या दहशतीमुळे सखाराम भोड हे रात्री रानात गेले नाही. काही जनावरे रात्री घरी आली; मात्र एक गाय व दोन वासरे आली नाहीत. शुक्रवारी (दि. 22) सकाळी सखाराम रानात गेले असता बिबट्याच्या हल्ल्यात गाय व वासरू जागीच ठार झाल्याचे दिसले, तर एक वासरू गंभीर जखमी अवस्थेत झुडपात पडलेले दिसले.

### 15 हून अधिक जनावरांचा फडशा

पानशेत खोऱ्यातील जंगलात वणव्यांमुळे तसेच अन्न-पाण्याच्या तुटवड्यामुळे वन्यप्राणी नागरी वस्त्यांत धाव घेत आहेत. गेल्या दीड महिन्यात बिबट्यांनी 15 हून अधिक जनावरांचा फडशा पाडला आहे.

### मादीसह चार बिबट्यांचा वावर

गंभीर जखमी वासरूही दगावण्याची शक्यता आहे. या भागात एका मादीसह 4 बिबट्यांचा वावर आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना रानावनात जाणे धोक्याचे झाल्याचे टेकपोळेचे माजी सरपंच दिनकर बामगुडे यांनी सांगितले.

"रायगड जिल्ह्यालगतच्या वेल्हे तालुक्यातील जंगलात बिबट्यांचा वावर आहे. बिबट्यांच्या हल्लात मृत्युमुखी पडलेल्या जनावरांचा पंचनामा करण्यात येणार आहे. मृत जनावरांचे शवविच्छेदन पशुसंवर्धन विभागामार्फत केले जाणार आहे. त्यानंतर नुकसानभरपाई शासन निर्णयानुसार संबंधित शेतकऱ्यांना दिली जाणार आहे.

– स्वप्निल उंबरकर, वनरक्षक, पानशेत विभाग

# आढळराव तुम्ही बदला घेण्यासाठी लढताय : कोल्हे

## मी जनतेकडे आशीर्वाद मागतोय

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या लोकसभेच्या निवडणुकीवेळी राष्ट्रवादीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांनी शिवाजीराव आढळराव पाटलांचा पराभव केला होता. गेल्या वेळचा बदला घेण्यासाठीच आपण निवडणुकीला उभे राहणार असून यावेळी निवडून येणार याची 100 टक्के खात्री आहे. ही निवडणूक हे सर्व रेकॉर्ड तोडणारी असेल, असे शिवाजीराव आढळराव पाटलांनी म्हटले होते. यावर खासदार अमोल कोल्हे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

अमोल कोल्हे म्हणाले की, 2019 सालचा बदला घेण्यासाठी शिवाजीराव आढळराव पाटील हे निवडणूक लढणार असतील तर एका सर्वसामान्य शेतकऱ्याच्या मुलाने लोकसभेत जाऊच नये का? का फक्त परदेशात कंपन्या असणाऱ्यांच्याच माणसाला लोकसभेत जाण्याचा अधिकार आहे? असा सवाल खासदार अमोल



कोल्हेंनी उपस्थित केला आहे. निवडणुकीला सामोरे जाण्याचा कोणाचा काय हेतू आहे, हे स्पष्ट होत आहे.

त्यांचे विधान पाहिले तर त्यांना 2019 चा बदला घ्यायचा आहे. मला मात्र सर्वसामान्य शेतकऱ्यांचा, सर्वसामान्य नागरिकांचा, महाराष्ट्रातील जनतेचा, महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचा आवाज हा दिल्लीत घुमत राहावा यासाठी मायबाप जनतेकडे मी आशिर्वाद मागतोय. त्यासाठी मी या निवडणुकीत उभा आहे. त्यांना जर बदला वाटत असेल तर मायबाप जनता सुज्ञ आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

# दर पडल्याने दुग्धोत्पादक हतबल..!

## अर्थकारण कोलमडले : दुधाचे अनुदान अद्याप मिळाले नाही



**पुणे | प्रतिनिधी**

दुधाचे दर पडल्याने दुग्धव्यवसाय करणारे शेतकरी अडचणीत आले आहेत. यामुळे ग्रामीण भागातील अर्थकारण कोलमडले आहे. दूध दर पडल्याने राज्य सरकारने 11 जानेवारी ते 11 मार्च 2024 दरम्यान येणाऱ्या दुधाला प्रतिलिटरमागे पाच रुपये अनुदान जाहीर केले आहे. मात्र, तेही अद्याप न मिळाल्याने शेतकऱ्यांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. सध्या दुधाचे दर सरासरी 25 रुपये प्रतिलिटर असून, दुष्काळी परिस्थितीने चाऱ्याचे व गोळी पेंडीचे दर वाढले आहेत. एक लिटर दूध निर्मितीसाठी 35 रुपये एवढा खर्च प्रतिलिटर येत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

अनेक बेरोजगार तरुणांनी दुग्धव्यवसायासाठी लाखो रुपयांची गुंतवणूक केली आहे. यासाठी अनेकांनी बँकेचे कर्ज घेतले आहे. ते फेडणे मुश्कील बनले आहे. राज्य सरकारने दुधाचे दर प्रतिलिटर 40 रुपये करावेत, अशी दुग्धोत्पादकांची मागणी आहे. कारखान्यांचा हंगाम संपत आल्याने जनावरांना उसाचे वाढे मिळणे कठीण बनले आहे. उन्हाची दाहकता वाढल्याने मका पिकावर मर्यादा दिसून येत असल्याने चारा महाग झाला आहे.

### कमिशन कपातीचा फटका

दौंड तालुक्यात एका खासगी दूध संस्थेने वाढीव दराने दूध घेत सर्वत्र पाय पसरले. मात्र, अँटिबायोटिक दूध सापडल्याच्या नावाखाली दूध उत्पादक शेतकऱ्यांची तीन रुपये, तर संस्थाचालकांचे एक रुपया कमिशन कपात करीत असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. मागणी खेड बाजारात समितीचे संचालक, व्यापारी माणिक गोरे, महेंद्र गोरे, विक्रम शिंदे यांनी केली आहे.

